आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार, दिनांक ०५ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. भटक्या जमाती आणि विमुक्त समाजाच्या विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वाशिम येथे प्रतिपादन; पोहरादेवी येथील बंजारा विरासत संग्रहालयाचे केल उद्घाटन.
2. मुंबई महानगरामध्ये 300 किलोमीटर लांबीचे मेट्रोचे जाळे निर्माण होत असून अटल सेतू, कोस्टल रोड, भूयारी मार्ग या प्रकल्पामुळे वाहतुकीचा वेळ वाचत असलयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच ठाणे येथे प्रतिपादन.
3. भारताची राज्यघटना हे छत्रपती शिवाजीमहाराजांच्या विचारधारेचं आजच्या काळातलं प्रतीक असल्याचं लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचं कोल्हापूरात प्रतिपादन.
4. आशियातील पहिला चार स्तरीय वाहतूक असलेला एलआयसी ते ऑटोमॅटिव्ह चौक पर्यंतच्या डबल डेकर उड्डाणपूलामुळे कामठी आणि छिंदवाडा रोडवरील वाहतूक होणार सुरळीत आणि अपघात-मुक्त - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी.

------------------------

पंतप्रधान

भटक्या जमाती आणि विमुक्त समाजाच्या विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाशिम येथे केले. सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारतला समर्पित असून शेतकरी हा आमच्या धोरणाचा प्रमुख पाया आहे, असेही मोदींनी नमूद केले. सुमारे 23 हजार 300 कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमांचा शुभारंभ करण्यासाठी महाराष्ट्रातील वाशिमच्या पोहरा देवी इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. बंजारा समाजाचा समृद्ध वारसा दाखवणाऱ्या वाशीम येथील पोहरादेवी येथील बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटनही पंतप्रधानांनी केले. या चार मजली संग्रहालयात बंजारा वारसा त्यांच्या नेत्यांच्या आणि चळवळींच्या पोर्ट्रेटद्वारे ठळकपणे मांडणाऱ्या 13 गॅलरी आहेत. समुदायाची संस्कृती आणि परंपरा जाणून घेण्यासाठी त्यांनी संग्रहालयाला भेट देण्याचे आवाहन केले. भटक्या विमुक्तांचा विकास करण्याच्या उद्देशाने केंद्र आणि राज्य सरकारांनी घेतलेल्या पुढाकारांचा पंतप्रधानांनी उल्लेख केला.

*साथियों एटीएटी केंद्र सरकारने ही, घुमंतू अर्ध घुमंतू समुदाय के लिए कल्याण बोर्ड का गठन भी कब है, इस समाज के साथ खुद एक पहचान को सही सम्मान मिले इस दिशा में भी बीजेपी सरकार और एनडीए सरकारे लगातार काम कर रही है, विकास की गति तेज करने के लिए यहां राज्य सरकार ने संत सेवालाल महाराज, बंजारा टांडा समृद्धि अभियान भी चलाया है।*

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि राज्य शासनाच्या प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण पंतप्रधानांनी आज केलं. तसंच कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प त्यांनी राष्ट्राला समर्पित केलं. शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करणाऱ्या १९ मेगावॅट क्षमतेच्या ५ सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अकोल्यातील जलालाबाद, बुलढाणा येथील पळशी आणि कोल्हापूर जिल्ह्यात हे सौर प्रकल्प आहेत. हे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारायला मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना प्रधानमंत्र्यांनी २० कोटी ५५ लाख रुपये विकासनिधी दिला. त्यापूर्वी बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटन त्यांनी केलं. बंजारा संस्कृतीत नगाऱ्याला विशेष स्थान असल्याने पंतप्रधानांनी स्वतः नगारा वादन करण्याचा अनुभव घेतला. पंतप्रधानांनी यावेळी जगदंबा देवी आणि सेवालाल महाराज आणि रामराव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतलं. तसंच बंजारा समाजातल्या मान्यवरांची भेट घेतली.या यावेळी महाविकास आघाड़ी सरकारनं शेतकऱ्यांच्या विविध योजनांमध्ये, सिंचन प्रकल्पांमध्ये अडथळे निर्माण केले असा आरोप त्यांनी केला. या कार्यक्रमादरम्यान प्रधानमंत्र्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या काही लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात धनादेशाचं वितरण केलं तसेच ही योजना महिला सक्षमीकरणाला बळ देत असल्याच सांगितल. लाडकी बहीण योजना बंद करण्याची हिंमत कोणामध्येच नाही. राज्य सरकारनं घेतलेल्या विविध निर्णयांमुळं आपलं सरकारं हे लाडकं सरकार झालं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. आजचा दिवस आनंदाचा असून सुवर्ण अक्षरात लिहून ठेवण्याचा आहे. यामुळं खऱ्या अर्थानं बंजारा समाजाची काशी इथं उभी राहिली असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पोहरागडाला भेट देणारे नरेंद्र मोदी हे पहिले प्रधानमंत्री आहेत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी यावेळी बोलताना बंजारा समाजाच्या हितासाठी विविध मागण्या केल्या.

-------------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी- ठाणे कार्यक्रम

मुंबई महानगरामध्ये 300 किलोमीटर लांबीचे मेट्रोचे जाळे निर्माण होत असून अटल सेतू, कोस्टल रोड, भूयारी मार्ग या प्रकल्पामुळे वाहतुकीचा वेळ वाचत आहे असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ठाणे येथे केल. महाविकास आघाडीने मुंबई मेट्रोचा प्रकल्प रखडत ठेवला असा आरोपही पंतप्रधानांनी यावेळी केला. ठाण्यात ३२ हजार ८००कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी आज पंतप्रधानांच्या हस्ते ठाणे शहरातील बोरीवडे मैदानात झाले त्यावेळी ते बोलत होते. ठाणे वर्तुळाकार मेट्रोआणि मुंबईत घाटकोपर जवळच्या छेडा नगरपासून ठाण्यातल्या आनंद नगरपर्यंतच्या पूर्वमुक्तमहामार्गाच्या विस्तारीत भागाची पायाभरणी पंतप्रधानांनी केली. याशिवाय नैना अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावितअधिसूचित क्षेत्रातल्या विकासकामांचा पहिला टप्पा, ठाणे महापालिकेच्यानव्या इमारतीचं भूमीपूजनही त्यांच्या हस्ते झाले. बीकेसी ते आरेदरम्यानच्या मेट्रो ३ चं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार असुन, त्यानंतर ते मेट्रोतून प्रवासही करणार आहेत. प्रवासादरम्यानप्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्यालाभार्थी, विद्यार्थी आणि कामगार यांच्याशी संवाद साधतील.याशिवाय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल आयोजित कार्यक्रमातप्रधानमंत्री सहभागी होणार आहेत.

------------------------

अमरावती बेलोरा विमानतळ

अमरावती बेलोरा विमानतळ भूमिपूजन,उदघाटन दिवाळीच्या पर्वावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन होणार आहे. यामुळे लवकरच अमरावतीकरांना बेलोरा विमानतळावरून 72 सीटर विमानाची सोय उपलब्ध होणार आहे. त्या अनुषंगाने बेलोरा विमानतळाची सर्व अधिकाऱ्यांसमवेत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ, शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या समवेत बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवि राणा यांनी संपूर्ण विमानतळाची पाहणी करून त्या ठिकाणी टर्मिनल बिल्डिंग, रनवे, रस्ते यासह इतर सर्व सोयी सुविधा इत्यादी कामासंदर्भात पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिशा निर्देश दिले.

------------------------

राहुल गांधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारधारेचं आजच्या काळातलं प्रतीक म्हणजे भारताची राज्यघटना आहे. असे सांगून लोकसभेतले विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांनी ही संविधानाची विचारधारा महाराष्ट्राच्या मातीनं, जनतेनं घडवलेली आहे अस आज कोल्हापुर येथे सांगितल. कोल्हापूर जिल्ह्यात कसबा बावडा इथं छत्रपतीशिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केल्यानंतर ते बोलत होते.

*ये राजनीतिक लड़ाई नहीं है, यह विचारधारा की लड़ाई है, यह कॉन्स्टिट्यूशन संविधान की लड़ाई है, और इसके अंदर संविधान के अंदर शिवाजी महाराज जी है, उनकी आवाज है उनकी सोच है उनकी विचारधारा है |*

शिवरायांनी ज्या गोष्टींसाठी आयुष्यभर लढा दिला, त्यासाठीआज आपण उभे राहिलो नाही, तर पुतळाउभारणं निरर्थक आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. शिवरायांच्या विचारधारेचं, राज्यघटनेचं रक्षण करण्याचं आवाहन त्यांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना केलं. त्यानंतर कोल्हापूरात झालेल्या संविधान संमेलनात राहुल गांधी यांनी संविधानाचे रक्षण करायचे असेल तर सर्वात आधी आरक्षणाची **50 %** ची मर्यादा काढून टाकावी लागणार आहे, इंडिया आघाडी ही मर्यादा हटवेल आणि लोकसभा आणि राज्यसभेत जातनिहाय जनगणनाही मंजूर करू अशी घोषणा केली.

-------------------------

डबलडेकर उड्डाण पूल

जे देशात नाही, आशियात नाही ते नागपूर मध्ये आहे असे सांगून अजनी चौक ते एअरपोर्ट हा डबल डेकर उड्डाणपूल, पूर्व नागपूरच्या पारडी मध्ये असणारा डबल-डेकर पूल आता नागपुरातील हा तिसरा एलआयसी ते ऑटोमॅटिव्ह चौक पर्यंत असलेला हा डबल डेकर पूल हा आशियातील चार स्तरीय वाहतूक असणारा पहिला डबल डेकर पूल ठरला असून या पुलामुळे कामठी आणि छिंदवाडा रोडवरील वाहतूक सुरळीत तसेच अपघात मुक्त होईल असे प्रतिपादन केंद्रीय व मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरात केले. स्थानिक एलआयसी चौकामध्ये आयोजित या उड्डाणपुलाच्या उद्घाटन कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. याप्रसंगी नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन ईटनकर, महानगरपालिका आयुक्त अभिजीत चौधरी महामेट्रोचे प्रकल्प संचालक राजीव त्यागी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी गडकरी यांनी या उड्डाणपुलाच्या साठी भूसंपादन करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगरोत्थान लेखाशीर्षामध्ये निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले तसेच भूसंपादनाचे अवघड काम पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांचे देखील त्यांनी आभार मानले. या पुलाला सदरला जोडण्याबरोबरच केंद्रीय रस्ते निधीतून कामठी रोड हा सिमेंट काँक्रीटचा करू असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

*किसी फ्लावर को सदर के तरफ एक एंट्री देने के बारे में मांग हुई है, उसका डिजाइन हमारे मेट्रो के अधिकारी जो है उन्होंने तैयार किया है, और उसके साथ पूरे रोड को मैं सेंट्रल रोड फंड में से सी.आर.एफ मे यह इसको अल्ट्राटेक वर्ल्ड टॉकिंग करके जहां तक कामठी रोड जाता है वह पूरा कंक्रीट का रोड उत्पादन और लाइट लगाकर उसको अच्छा बनाने का काम मैं अपने डिपार्टमेंट मैं से करूंगा|*

महामेट्रो आणि केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्रालया अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या आणि **897** कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या या उड्डाणपुलामध्ये केवळ डबल डेकर पुलाचा खर्च **573** कोटी रुपये आहे. **5.6** किमी लांबीच्या **4-**लेन कामठी रोडवर असणा-या या डबल डेकर उड्डाणपुलाच्या संरचनेत रिब आणि स्पाइन या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून, त्यामुळे नैसर्गिक प्रकाश आणि हवा पुरेशा प्रमाणात उड्डाणपुलामध्ये येऊ शकते. ही रचना उड्डाणपूल आणि मेट्रो मार्गाला जोडून चार-स्तरीय वाहतूक व्यवस्था तयार करते. पहिल्या स्तरावर राष्ट्रीय महामार्ग, दुसऱ्या स्तरावर भारतीय रेल्वे ट्रॅक आणि तिस-या स्तरावर उड्डाणपूल तर चौथ्या स्तरावर रेल्वे मेट्रो मार्ग आहे. गड्डि गोदाम चौक, कडबी चौक, इंदोरा चौक, नारी रोड आणि ऑटोमोटीव्ह चौक अशी पाच मेट्रो स्थानके या उड्डाण पुलावर आहेत.

-------------------------